## दिनांक २०.०१.२०२२ रोजीचे सर्वसाधारण सभेत पारित करण्यात आलेला तसेच त्याच सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा

(प्रशासकीय विषय)

विषय क्रमांक ५ :- (दिनांक २०.१.२०२२) शासनाचे पत्र

पत्र क्रमांक २:- "महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकास योजनेअंतर्गत" निधी वितरीत करणे बाबत.

संदर्भ :- २. शासन निर्णय क्र.मनपा -२०२१/प्र.क.१९४(०६) /न.वि-१६.मंत्रालय,मुंबई - ४०००३२, दिनांक ३ नोव्हेंबर २०२१

ठराव क्रमांक ५/२ (२) - संदर्भीय पत्रान्वये अमरावती महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांच्या विकास या योजने अंतर्गत संदर्भीय पत्रामध्ये सोबत जोडलेल्या विवरण पत्रामधील कामासाठी रक्कम रु.१.०० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आलेला आहे. शासन निर्णयामध्ये प्रकल्प खर्चाचा ७५ टक्के हिस्सा राज्य शासनाचा व २५ टक्के हिस्सा महानगरपालिकेचा राहणार असे नमुद केले आहे. अमरावती महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता शासन निर्णय न.वि.विभाग दि.१२ डिसेंबर २०१७ मधील ४ (ड) नुसार १०० टक्के अनुदान अपवादात्मक परिस्थिती असल्यामुळे उर्वरीत २५ टक्के निधी शासनाकडे मागणी करण्याच्या मान्यतेस ही सभा सर्वानुमते मंजुरी प्रदान करीत असुन सदर पत्राचे अवलोकन करीत आहे.

स्वा/-
नगरसचिव,
महानगरपालिका, अमरावती

स्वा/-
सभापती तथा महापौर,
महानगरपालिका, अमरावती

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.